# पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांची संयुक्त बैठक तात्काळ वितरण सुरळीत करा- जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्ह्यात येणारा पेट्रोल डिजेलचा साठा हा पूर्वी इतकाच किंबहुना थोडा जास्तच आहे. असे असतांना पेट्रोल पंपावर रांगा दिसत आहेत. मागणी व पुरवठा यात वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांच्या दरम्यान असलेल्या तक्रारींवर तातडीने तोडगा काढून वितरण सुरळीत करा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पेट्रोलियम वितरण कंपन्या व पेट्रोलपंप चालक यांना दिले.

जिल्ह्यातील पेट्रोलपंपांवर वाहनधारकांच्या गेल्या दोन दिवसांपासून रांगा लागलेल्या दिसत आहेत. ही परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत घटकांबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पेट्रोलपंप चालक आणि वितरक कंपन्यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक बोलावली होती. बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, लेखाधिकारी पी.पी. होळकर, सहा. पुरवठा अधिकारी संदीप शिंदे,भारत पेट्रोलियमचे शशांक तिवारी, हिंदुस्थान पेट्रोलियमचे अजयकुमार सिन्हा, इंडियन ऑईलचे गणेश खेत्री तसेच पेट्रोलपंप चालक संघटनेचे अकील



अब्बास, जिशान देशमुख, गणेश दरख, राजेंद्र सलुजा, नवजिंदरसिंग आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, अफवा पसरवणाऱ्यांवर पोलीस विभागामार्फत तपास करुन कारवाई होईलच. मात्र पुरेसा इंधन साठा असतांना पेट्रोलपंपावर रांगा का लागत आहेत? याबाबत वितरक कंपन्या आणि पेट्रोलपंप चालक यांनी आपापसात समन्वय साधून परिस्थिती हाताळावी व वितरण सुरळीत करावे. जिल्हाधिकारी म्हणाले की, लोकांना आपल्याकडील साठ्याची माहिती द्या. लोकांना इंधन उपलब्ध करुन द्या. आजच जिल्हा प्रशासनाने दुचाकी वाहनांना २०० रुपयांचे पेट्रोल व चारचाकी वाहनांना २००० रुपयांचे इंधन असे जे बंधन घातले होते ते ही हटवले आहे. त्यामुळे वितरणाचा कोणताही अडथळा वा निर्बंध नाही. इंधन वितरण डेपो ते पंप या दरम्यान होणाऱ्या वाहतुकीचा कालावधी कमीत कमी करुन इंधन उपलब्ध करा. पेट्रोलपंपांवर कायदा सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात पोलिसांना सुचना देण्यात आली आहे. मात्र नागरिकांनी संयम ठेवावा. अफवांवर विश्वास ठेवू नये. नेहमीप्रमाणे पेट्रोल डिजेल आपल्या वाहनात भरा. उगाचच जादा साठा करु नका, असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. ग्रामिण भागात विशेषतः शेतीच्या कामांना लागणाऱ्या डिजेलचीही उपलब्धता करुन देण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आल्याचेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्पष्ट केले.

### इंधन पुरवठा मर्यादीत करण्याचे आदेश रद्द

**पेट्रोलपंपांवरील वाहनधारकांची अचानक गर्दी वाढल्याने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन पेट्रोल डिजेल मर्यादीत करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, डिजेल व पेट्रोलचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर इंधन निर्बंधाच्या आदेशाची आवश्यकता नसल्याने आधीचे आदेश रद्द करण्यात येत असल्याचे आदेश आज पुरवठा विभागाने जारी केले.**

# जिल्हा प्रशासनाच्या पारदर्शक भरती प्रक्रियेमुळे सामान्य कुटुंबातील मुले झाली पोलीस पाटील

## पोलिस पाटील प्रशानाचा कान व डोळा : राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

जिल्हा प्रशासनाकडून पारदर्शक पोलीस पाटील आणि पोलीस भरती प्रक्रिया झाल्याने सामान्य कुटुंबातील मुले पोलीस पाटील व पोलीस भरती मध्ये यशस्वी ठरली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या द्वारा जिल्हा प्रशासनाचा कारभार स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने चालू असून वशिलेबाजीला आळा बसला. यामुळे सामान्य कुटुंबातील मेहनती अभ्यासू व जिद्दी मुलांना यश मिळाले. पोलीस पाटील कायदा-सुव्यवस्था अबाधीत राखण्याची जबाबदारी संभाळणारा गाव खेड्यातील प्रशासनातील शेवटचा घटक घटक आहे. सामाजिक समन्वय राखून कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी





प्रशासनाचे कान व डोळे म्हणून प्रामाणीकपणे काम केले पाहिजे. शासन-जनता यांच्यातील दुवा म्हणून प्रभावी पणे भूमिका पार पाडावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी नूतन पोलीस पाटलांच्या सत्कार समारंभ प्रसंगी केले. जिल्हा प्रशासनामार्फत स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पोलीस पाटलांची भरती करण्यात आली. यादरम्यान बीड पोलीस भरती प्रक्रिया पूर्ण झाली. स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या पोलीस पाटील व पोलीस यांचा संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय येथे राजेंद्र मस्के यांच्या हस्ते हृदय सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभास पोलीस पाटील-पोलीस पाटील, वरवटी सुमित मतकर ,मोरगाव ,जाधव जयंत , पाटोदा बें जाधव अश्विन, पिंपरनई पवार गणेश, भाळवणी मोहिनी दहे, गवळवाडी मस्के अदित्य लक्ष्मण, बेलगाव, शेळके महादेव दिगंबर, काकडहिरा, बागलाने शुभम रंगराव, भवानवाडी, जगताप सुर्यकांत जीवनराव, आबेंसावळी, गुदेंकर प्रितीक्षा आदिनाथ,जरड, काकडे अक्षय अनिरुद्ध, दगडी शहजनपुर, इंदुरे विशाल प्रकाश, पिंपळवाडी, कळसाने राहुल बाबुराव ,पोखरी घाट, वैभव महादेव खिल्लारे, उमेश श्रीमंत खिल्लारे, लिंबागणेश, पायल प्रमोद निर्मळ, रोहित प्रमोद निर्मळ, आहेर धानोरा आदमाने ऋतुजा ,गवळवाडी, विठ्ठल राजेंद्र मस्के , मझेंरी अजय धसे, सह आदी उपस्थित होते

# उसतोड कामगाराच्या मुलाची पोलीस खात्यात भरारी ; राहुल कळसणेचा गुजर समाजाकडून सत्कार



बीड । प्रतिनिधी

राहुल सुनिता बाबुराव कळसणे याची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याबद्दल गुजर समाजाच्या वतीने त्याचा व त्याच्या आई-वडिलांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

राहुलचे आई-वडील साध्या कुटुंबातील असून ऊसतोडणी करून मुलांना अधिकारी बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे आदर्श पालक आहेत. आई-वडील ऊसतोडणीसाठी बाहेर गेल्यानंतर राहुलने स्वतः स्वयंपाक करणे, शेतीतील कामे सांभाळणे आणि उर्वरित वेळेत जिद्द व चिकाटीने अभ्यास करणे अशी कसरत केली. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे हा निर्धार मनाशी बाळगून त्याने रात्रंदिवस मेहनत घेतली आणि त्याचे फळ म्हणून आज त्याची पोलीस खात्यात निवड झाली आहे. राहुलने केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे नाव उंचावले आहे.

यावेळी बोलताना गुजर समाजाचे नेते अर्जुन दादा बहिरवाळ म्हणाले की, राहुलला आज यश मिळाले असले तरी इतर युवकांनीही खचून न जाता मेहनतीने पुढे जावे. राहुलचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा, हीच अपेक्षा आहे.

तसेच गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी सांगितले की, राहुलच्या रूपाने समाजाची प्रगती दिसत आहे. तळागाळातील युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आई-वडिलांचे, समाजाचे आणि गावाचे नाव मोठे करावे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना प्रारंभ

## क्रीडा, कलागुणांची जोपासना आवश्यक : विभागीय आयुक्त पापळकर

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

कामकाजातील तणाव घालविण्यासाठी क्रीडा व कलागुणांची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी महसूल विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्पर्धांमधील आपला सहभाग वाढवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना केले.

विभागीय क्रीडा संकूल येथे आज महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना सुरुवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, अपर आयुक्त रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य)



संगिता राठोड, संगिता सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, संतोष गोरड, अरुण जऱ्हाड, नीलम बाफना तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, आपल्या दैनंदिन जगण्यात खिलाडुवृत्तीने जगायचे असते, त्या खिलाडुवृत्तीची जोपासना अशा स्पर्धांमुळे होते. त्यामुळे वातावरण सकारात्मक होऊन निकोप स्पर्धा निर्माण होते. क्रीडा व सांस्कृतिक गुणांची जोपासना ही आयुष्यात आवश्यक असते,असेही त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त पापळकर म्हणाले की, आपल्यातला गुणांचा विकास करण्यासाठी खेळा. छत्रपती संभाजीनगर विभागाला राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळायला हवे या जिद्दीने खेळा. उत्कृष्ट सादरीकरणाचा ध्यास घ्या. तणावमुक्त जीवन जगायचे असेल तर क्रीडांगणावर सराव करुन , खेळून घाम गाळावा लागतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी केले. या स्पर्धांमधील विजेते खेळाडू व संघ हे विभागीय क्रीडा स्पर्धांसाठी पाठविले जातील. विभागीय क्रीडा स्पर्धा ह्या परभणि येथे दि.३ ते ५ एप्रिल दरम्यान होणार आहेत.

# शनिवारी जिल्ह्यातील चार मंडळात समाधान शिबिराचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी आणि विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियान (टप्पा क्र. १) राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळामध्ये या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून याद्वारे प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारात पोहोचवण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत प्रलंबित नोंदी अद्ययावत करणे, डिजिटल सेवा पोर्टलवरील प्रकरणांचा निपटारा करणे आणि 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' अंतर्गत तातडीने दाखले व सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महसुली अडचणींमुळे अडकलेली सर्वसामान्यांची कामे या शिबिरांच्या माध्यमातून मार्गी लागणार असल्याने ग्रामीण भागातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.

कार्यक्रमानुसार, शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्यातील चार महत्त्वाच्या मंडळामध्ये ही शिबिरे पार पडणार आहेत. यामध्ये जालना तालुक्यातील विरेगाव मंडळातील साळेगव्हाण महादेव मंदिर, बदनापूर तालुक्यातील सेलगाव मंडळात जि.प. शाळा सेलगाव, अंबड तालुक्यातील वडीगोद्री मंडळातील श्री. गुरुदेव विद्यामंदिर वडीगोद्री आणि भोकरदन तालुक्यातील हसनाबाद मंडळातील मारोती मंदिर हसनाबाद या ठिकाणांचा समावेश आहे. नागरिकांनी आपल्या कामांशी संबंधित आवश्यक कागदपत्रासह या शिबिरांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

### चला राम राम म्हणा...

वानराचा नर, नराचा माणुस मॅन झाला, सिसो,  
ब्रो अन ड्युड चाही जमाना आला, फॅशनच्या  
नावाखाली नर मादी पुढारले, नशा पाणी  
व्यभिचारात सारेच सुधारले,  
संस्कारी माणसाचा हरवलाय बाणा,  
चला राम राम म्हणा...  
मंत्राचा प्रवास तंत्रावर अन रोबोट वर गेला,  
शस्त्रास्त्राच्या उन्नतीने विश्व जाईल तळाला,  
प्रगलीचा झेंडा ग्रह लायवर रोवला, माणुसकी  
मारून विस्तारवाद जोडला,  
कुठ आहे समाधान अन शांतीची विणा,  
चला राम राम म्हणा...  
जीवाची किंमत स्वतःच्याच फक्त,  
नाण्याच्या बाजाराचे सगळेच भक्त,  
माय बाप ओझे झाले, वृध्दाश्रमात गेले,  
श्रीमंत घालली लाथा, तरी गरीबच वाचली  
गाथा. नीतीमुल्याची जाण राहिली नाही पुन्हा  
चला राम राम म्हणा...

– नखाते ए.बी.

# दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता वित्तीय सहाय्य स्वावलंबनाची सुवर्णसंधी; योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

परभणी । प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता साधनसामग्री (टुलकिट) घेण्यासाठी वित्तीय सहाय्य ही योजना राज्यशासनाने सुरु केली आहे. त्याचा लाभ दिव्यांग नागरिकांनी अवश्य घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी आर.व्ही. चकोर यांनी केले आहे.

योजेनच्या लाभाचे निकष – ही योजना दिव्यांगत्वाच्या सर्व प्रवर्गासाठी लागू राहील. अर्जदार / लाभार्थ्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. योजनेतंर्गत अर्थसहाय्याची कमाल मर्यादा रुपये १५,०००/- इतकी राहील. शासकीय प्रशिक्षण संस्थेस/ शासनमान्य प्रशिक्षण संस्था अथवा दिव्यांग कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातून प्रशिक्षण घेतलेला दिव्यांग प्रशिक्षणार्थी या योजनेसाठी पात्र असेल. प्रशिक्षित दिव्यांग महिलांना प्राधान्य दिले जाईल. लाभार्थ्यास मंजूर केलेले आर्थिक सहाय्य त्याने प्रशिक्षण घेतलेल्या व्यवसायासाठी लागणाऱ्या साधनसामग्री (टुलकि) साठीच असेल.

लाभार्थ्यांनी सादर करावयाची कागदपत्रे – विहीत नमुन्यातील अर्ज, आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी) दिव्यांगत्व प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, साधनसामग्री (टुलकिट) / आवश्यक साहित्याची यादी. आधारसंलग्न बँक खात्याचा तपशील.

सदर योजनेचे दिव्यांग सहाय्यक पोर्टलवरील अर्जाची छाननी करत असताना अर्जदाराचे अधिवास प्रमाणपत्र ऐवजी वीज बील, रेशन कार्ड अपलोड केलेले असतात. तरी अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य आहे याशिवाय इतर कागदपत्रे ग्राह्य धरली जाणार नाही.

त्याचप्रमाणे केवळ दिव्यांग प्रमाणपत्र सादर केले जाते परंतु युडीआयडी कार्ड संलग्न केले जात नाही. सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी युडीआयडी कार्ड असणे बंधनकारक आहे.

तसेच प्रशिक्षण प्रमाणपत्राऐवजी केवळ एमएस-सीआयटी किंवा अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले असतात. परंतु टुलकिट योजना प्रशिक्षण प्राप्त उमेद्वारांसाठीच आहे. तरी शासनमान्य/शासकीय/दिव्यांग कर्म शाळेमध्ये प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे तेच जोडले जावे.

त्याचप्रमाणे टुलकिट यादी ऐवजी व्यवसायाचे फोटो सादर केलेले असतात. प्राप्त प्रशिक्षणानुसार आवश्यक टुलकिटची यादी संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रमाणित करून घेतलेली जोडावी.

उपरोक्त प्रमाणे सादर केलेले अर्ज हे नामंजूर करून परत केले जातात. त्यामुळे वेळेचा अपव्यय होतो. तरी आवश्यक वाबींची पूर्तता असलेले अर्ज दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर सादर करावेत. अर्ज सादर करताना दिव्यांग कल्याण विभागाचा शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ मधील मुदा क्र. २ व ३ च्या निकषानुसार अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषदेतील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. चकोर यांनी केले आहे.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार दि. २८ मार्च २०२६ •

## बीडचे भूमिपुत्र प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे ( एलसीबी ) शाखेच्या पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पेठ बीड भागातील रहिवाशी असलेले प्रमोद क्षीरसागर यांची पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी ) पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक २६ मार्च रोजी त्यांनी अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीने बीड जिल्ह्याची मान स्वाभिमानाने उंचावली असून पेठ बीड भागातील व बीड शहरातील मित्रपरिवार व नातेवाईकांनी प्रमोद क्षीरसागर यांचे अभिनंदन केले असून प्रसिद्ध सीताई कन्स्ट्रक्शनचे संचालक श्याम क्षीरसागर, पप्पू क्षीरसागर तसेच रणजीत क्षीरसागर यांचे ते बंधू आहेत. पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलीस निरीक्षक पदी बीडचे भूमिपुत्र प्रमोद क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी प्रमोद क्षीरसागर यांनी नवी मुंबई येथील पनवेल पोलीस स्टेशन पुणे पिंपरी चिंचवड भागातील हिंजवडी, वाकड, चतुर्शिंगी ,तळेगाव दाभाडे ,चाकण, आळेफाटा, शिक्रापूर या पोलीस स्टेशनला अतिशय उत्कृष्ट काम केलेलं असून विविध आव्हानात्मक व किचकट गुन्ह्यांतील आरोपीचा शोध लावलेला आहे. पुणे परिसरात दांडगा जनसंपर्क व गरजवंतांना आवश्यक ती मदत करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. पुणे जिल्ह्याची गुन्हेगारी रोखण्याची पूर्ण जबाबदारी प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर आली आहे, अत्यंत मनमिळाऊ व पोलीस तसेच जनता यांचे संबंध दृढ करण्यासाठी प्रमोद क्षीरसागर नेहमीच प्रयत्नशील असतात, गुन्हेगारावर वचक निर्माण करत अत्यंत किचकट गुन्ह्यांचा तपास त्यांनी पूर्ण केलेला आहे. प्रमोद क्षीरसागर यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली असून त्यांचा प्रदीर्घ अनुभव व गुन्हेगारावर असणारा वाचक पाहता पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या (एलसीबी ) पोलीस निरीक्षक प्रमुख पदाची जबाबदारी ते यशस्वीरित्या पार पाडणार असा ठाम विश्वास पुणे ग्रामीण भागातील नागरिकांच्या वतीने व्यक्त केला जात आहे. बीड शहरातील भूमिपुत्र असलेले प्रमोद क्षीरसागर यांच्या निवडीने बीड जिल्ह्याची मान उंचावली आहे.

# पिंपळेश्वर महादेव मंदिरातील...

## ५१ फूट उंच कलश कामाचा आ.सुरेश धस यांच्या हस्ते शुभारंभ उत्साहात

**आष्टी । प्रतिनिधी**

शहरातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या पिंपळेश्वर महादेव मंदिर येथे ५१ फूट उंचीच्या भव्य कलश कामाचा शुभारंभ आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते रामनवमीच्या पवित्र मुहूर्तावर उत्साहात पार पडला.

पिंपळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष असलेल्या आमदार धस यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात विविध विकासकामे सुरू असून, त्यामध्ये या भव्य कलश



उभारणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी बोलताना आमदार धस यांनी सांगितले की, गोरगरिबांच्या मुला-मुलींचे विवाह सोहळे कमी खर्चात पार पडावेत यासाठी मंदिर परिसरात मंगल कार्यालयाचे काम सुरू असून ते सध्या प्रगतीपथावर आहे. तसेच भाविक भक्तांच्या सोयीसाठी येथे नमो गार्डन उभारण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. या शुभारंभ सोहळ्याला व्यापारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय मेहेर, खंडू जाधव, राहुल मूथा, बाळू मेहेर, संतोष चव्हाण, देवस्थानचे सचिव संजय मुळे, सदस्य सहस्त्रबुद्धे, लक्ष्मण रेडेकर, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, अॅड.बाळासाहेब मोरे, सरपंच अशोक मुळे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, आत्माराम फुंदे, सतिष जंगले, नगरसेवक अक्षय धोंडे, पुरोहित अनंत जोशी, राधाकिसन पोकळे, दीपक निकाळजे, राजू निकाळजे, नगरसेवक किशोर झरेकर, नगरसेवक बाळासाहेब घोडके, विनय पटथरीया, कपिल अग्रवाल, अजित मुळे, निखिल ढेंगे, पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार सचिन रानडे, श्रीकांत भोज,सूरज रोकडे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. आष्टी शहरासह पंचक्रोशीतील गावांमधील भाविक भक्तांनी या ५१ फूट उंच कलश उभारणीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार धस यांनी केले. तसेच परंपरेनुसार गावातील महिला भगिनींचाही या कार्यात सहभाग असतो, त्यामुळे त्यांनाही या उपक्रमाची माहिती देऊन सहभागी करून घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या भव्य कलश उभारणीमुळे पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या वैभवात अधिक भर पडणार असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## बीड शहरातील दिव्यांग नागरिकांनी ३१ मार्चपूर्वी यूडीआयडी कार्ड आधारशी लिंक करावे

### गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या विविध दिव्यांग कल्याणकारी योजनांचा लाभ अखंडपणे मिळण्यासाठी दिव्यांग नागरिकांनी आपले यूडीआयडी (णऊखऊ) कार्ड आधारशी लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, या मुदतीपुर्वी लिंकिंग न केल्यास संबंधित अनुदान व लाभ बंद होऊ शकतात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**● लिंकिंग कशी करावी ? ●**

**दिव्यांग नागरिकांनी www.swavlambancard.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच, आवश्यक असल्यास संबंधित शासकीय कार्यालयात प्रत्यक्ष जाऊनही मदत घेता येईल. अर्ज करताना आधार क्रमांक, यूडीआयडी कार्ड व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. शासनाच्या विविध योजना, अनुदाने व सुविधा नियमितपणे मिळण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याने बीड शहरातील सर्व दिव्यांग नागरिकांनी ३१ मार्चपूर्वीच यूडीआयडी-आधार लिंकिंग पूर्ण करावे, असे आवाहन शेवटी फारुख पटेल व अमर नाईकवाडे यांनी केले आहे.**

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दिव्यांग नागरिकांकडे यूडीआयडी कार्ड उपलब्ध असले तरी अद्याप अनेकांनी आधार लिंकिंगची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे अशा नागरिकांना शासनाच्या योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

यासंदर्भात बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी बीड शहरातील सर्व दिव्यांग नागरिकांना तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की,

दिव्यांग बांधवांनी शासनाच्या योजनांचा लाभ सुरळीतपणे मिळवण्यासाठी यूडीआयडी कार्ड आधारशी लिंक करणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिम मुदत जवळ येत असल्याने विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करावी.

## श्रीरामनवमी निमित्त संगीतमय सुन्दरकाण्ड चे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

श्रीरामनवमी च्या पर्वणीमीत्त बीड मधे गुरुवारी दि.२६ मार्च २०२६ रोजी महेश युवा मंच च्यावतीने श्रीरामचरितमानस ग्रंथामधील मधील संगीतमय सुन्दरकाण्ड चे आयोजन करण्यात आले होते. या संगीतमय सुन्दरकाण्ड चे गायन श्री रामदेवबाबा जम्मा व भजन गायक श्रीवल्लभ नंदलालजी कासट यांनी बालाजी मंदिर, बीड येथे केले. यांच्या सुश्राव्य गायनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. सुन्दरकाण्ड चे पठण झाल्यावर प्रभू श्रीरामाची व



हनुमानाची महाआरती करण्यात आली. आलेल्या भाविकांना महेश युवा मंच च्यावतीने भोजन प्रसादाचे नियोजन करण्यात आले होते. या वेळी भाविक भक्तांची मोठया संख्याने उपस्थिती होती.

## आनंद ऋषी हॉस्पिटलमध्ये मोफत नेत्र तपासणी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

सर्व वकील बंधू-भगिनींसाठी २४ मार्च ते ३१ मार्च (रविवार वगळून) या कालावधीत आनंदऋषी यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त मोफत नेत्र तपासणी अभियान सुरू करण्यात आले आहे. जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला असलेल्या आनंदऋषी डायग्नोस्टिक सेंटर येथे दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत ही तपासणी अँड भंडारी यांच्या सौजन्याने करण्यात येत आहे. इच्छुकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानाचा औपचारिक उद्घाटन सोहळा नुकताच वकील संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच ज्येष्ठ विधिज्ञांच्या उपस्थितीत



उत्साहात पार पडला. यावेळी बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सुभाष पिसरे अँड, उपाध्यक्ष रविराज देशमुख अँड, सहसचिव धीरजकुमार कांबळे अँड, ग्रंथपाल सचिव अजीम सर अँड, महिला प्रतिनिधी मनीषा कुपकर गडकर अँड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना भंडारी अँड यांनी केली. गौतमजी खाटोड साहेब यांनी आनंदऋषी हॉस्पिटलच्या कार्याचा आढावा घेत, रुग्णसेवेसाठी उभारलेली संपूर्ण इमारत आनंदऋषींनी स्वतः मोफत दिल्याची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतामध्ये अँड सुभाष पिसरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शनअँड मनीषा कुपकर गडकर यांनी केले. यावेळी त्यांनी जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेच जाणावा या उक्तीचा उल्लेख करून आनंदऋषी यांच्या सेवाभावी कार्याला अभिवादन केले. तसेच त्यांनी स्वतःच्या जीवनातील अनुभव मांडत सर्वांना श्रीराम जन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ साबळे साहेब, पंडित साहेब, प्रवीण राग साहेब, ललवाणी सर, प्रा. शेंडगे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा या ब्रीदवाक्यानुसार आनंदऋषी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, मोफत नेत्र तपासणीस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी सोडली रयत क्रांती संघटनेची साथ

### शिवसेनेच्या माध्यमातून फोडणार शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात शेतकरी चळवळीच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. संघटनेतील आक्रमक, अभ्यासू आणि प्रत्येक आंदोलनात अग्रभागी असणारे राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हा अध्यक्ष शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात समस्त बीड जिल्हा कार्यकारिणी तसेच महाराष्ट्रातील सतरा जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांसह शेतकरी कष्टकरी हितासाठी संघटनेतून बाहेर पडत विकासाचा म्हणजे शिवसेनेचा मार्ग धरला. याच पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी



प्रा.एन डी चौघुले व शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांच्या नेतृत्वात एकत्रितपणे शिवसेनेत प्रवेश केला आहे. या प्रवेशामध्ये मराठवाडा व विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात कार्यकर्त्यांचा ओघ वाढला आहे. या मोठ्या प्रवेशामुळे शिवसेनेला मोठे बळ मिळाले असून राज्यात तरुण तर्फडदार चळवळीच्या कार्यकर्त्यांची मोठी फळी तयार झाली असून, राज्यातील शेतकरी संघटनांच्या राजकारणात नवे वळण मिळाले आहे. शेतकरी नेते संदिप दादा वाहुळे यांनी रयत क्रांती शेतकरी संघटनेतील महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तसेच बीड जिल्हा अध्यक्ष म्हणून अत्यंत प्रभावी भूमिका बजावत होते. प्रत्येक आंदोलनात अग्रभागी राहून त्यांनी संघटनेला बळ दिले होते. आक्रमक भूमिका, अभ्यासू दृष्टीकोन आणि कार्यकर्त्यांशी थेट संपर्क यामुळे ते संघटनेतील स्फोटक व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक लढवण्याची तयारी ही सुरू होती. यांच्या संघटनेतील कार्याचा आणि बांधणीचा शिवसेनेला नक्कीच फायदा होईल.

## जयभवानीत लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-2013 या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

### ● अंतर्गत महिला तक्रार समिती आयोजित एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दि. २७ मार्च २०२६ रोजी 'लिंग समानता : महिलांचे कायदेशीर हक्क आणि पॉश कायदा-२०१३' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुण्या म्हणून पाटोदा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील ड.श्रीमती श्वेता किशोर राख आणि ड. श्रीमती दिपाली पांडव या उपस्थित होत्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक आणि कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या सत्काराने झाली. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी महिलांचे हक्क, कायदे आणि समाजातील त्यांचे स्थान यावर भाष्य केले. महिलांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक राहून आत्मविश्वासाने पुढे यावे,



असे त्यांनी आवाहन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या पिठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी केले. त्यांनी लिंग समानता आणि महिलांचे कायदेशीर हक्क यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास समाज अधिक सुरक्षित, समतोल आणि प्रगत होईल, असे स्पष्ट केले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात ड.श्रीमती दिपाली पांडव यांनी 'लिंग समानता' या विषयावर सखोल मार्गदर्शन करत स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांचे सशक्तीकरण हे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. द्वितीय सत्रात ड.श्रीमती श्वेता राख यांनी 'महिलांचे कायदेशीर हक्क तसेच पॉश कायदा-२०१३' विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि आंतरर्गत तक्रार समितीची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी कार्यशाळेतील विषयांचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी व महिलांनी कायद्यांची माहिती करून घेणे आणि त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या कार्यशाळेमुळे उपस्थितांना लिंग समानता, महिलांचे हक्क आणि कार्यस्थळी सुरक्षिततेविषयी उपयुक्त माहिती मिळाली. या कार्यशाळेला सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.